**४९, महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. अमळनेर यांच्या मौजे अमळनेर ता. अमळनेर जि.जळगावं येथील स.नं. ९७२/२ पैकी ७७५.२१.५०.चौ.मी या जागेस भिंतीचे कुंपण करण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**
**शुध्दीपत्रक....**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांक : राछासे-२०२३/प्र.क.२४० (ई-१२६७१५०)/क्रीयुसे-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०४ मे, २०२६.

संदर्भ :- १) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.राछासे-२०२३/प्र.क्र.२४०/क्रीयुसे-३, दि.२२/०९/२०२५
२) समादेशक अधिकारी, ४९ राष्ट्रीय छात्र सेना, अमळनेर यांचे दिनांक ३०/०३/२०२६ रोजीचे पत्र.

प्रस्तावना: -

संदर्भ क्र.१ अन्वये ४९, महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. अमळनेर यांच्या मौजे अमळनेर ता. अमळनेर जि.जळगावं येथील स.नं. ९७२/२ पैकी ७७५.२१.५०.चौ.मी या जागेस भिंतीचे कुंपण करण्यास प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर बाबीकरिता येणारा खर्च हा शालेय शिक्षण अंतर्गत लेखाशीर्ष मागणी क्र. ई-४, ४२०२, (००) (०४) शिक्षण उपसंचालक व शिक्षण विभागाच्या कार्यालय इमारतीचे बांधकाम, (कार्यक्रम), ५३, मोठी बांधकामे (४२०२ ६२२८) यांतर्गत उपलब्ध निधीतून भागविण्याची तरतूद करण्यात आली आहे.

तथापि, शासन निर्णय दिनांक १९/११/२०२५ अन्वये क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या अधिपत्याखालील विभागीय उपंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्या अंतर्गत राष्ट्रीय छात्र सेना कार्यालयाच्या व क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या क्षेत्रीय कार्यालयांच्या बांधकामासाठी नियोजन व वित्त विभागाने दिलेल्या मान्यतेनुसार मागणी क्रमांक ई - ४, ४२०२ - शिक्षण, क्रीडा, कला व संस्कृती यांवरील भांडवली खर्च, ०३ - क्रीडा व युवक सेवा, ०५१ - बांधकाम, (००) (००) (०१) राष्ट्रीय छात्र सेना व क्रीडा संचालनालयाच्या कार्यालयांची बांधकामे (४२०२ ६६०२) ५३ मोठी बांधकामे हे बांधकामासाठी नवीन लेखाशीर्ष उघडण्यात आलेले आहे.

सबब, संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णय दिनांक २२/०९/२०२५ मध्ये सुधारणा करून सदर बाबीकरिता येणारा खर्च हा क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या अधिपत्याखालील लेखाशीर्ष ४२०२ ६६०२-५३ मोठी बांधकामे या लेखाशीर्षातून करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन शुध्दीपत्रक:-</u>**

संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णय, दिनांक २२/०९/२०२५ मधील लेखाशीर्षामध्ये सुधारणा करण्यासंदर्भात परि.क्र.४ मध्ये नमूद लेखाशीर्ष "मागणी क्र. ई-४, ४२०२, (००) (०४) शिक्षण उपसंचालक व शिक्षण विभागाच्या कार्यालय इमारतीचे बांधकाम, (कार्यक्रम), ५३, मोठी बांधकामे (४२०२ ६२२८)" **<u>याऐवजी</u> मागणी क्रमांक ई - ४, ४२०२ - शिक्षण, क्रीडा, कला व संस्कृती यांवरील भांडवली खर्च ०३ - क्रीडा व युवक सेवा, ०५१ - बांधकाम, (००) (००) (०१) राष्ट्रीय छात्र सेना व क्रीडा संचालनालयाच्या कार्यालयांची बांधकामे (४२०२ ६६०२) ५३-मोठी बांधकामे** या लेखाशीर्षातून ४९ राष्ट्रीय छात्र सेना, अमळनेर कार्यालयाच्या जागेस भिंतीचे कुंपण करण्यास लागणारा खर्च भागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. शासन निर्णय, दिनांक २२/०९/२०२५ मधील इतर सर्व अटी व शर्ती कायम राहतील.

३. सदर शासन शुध्दीपत्रक निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०५०४१२५७२४१८२१ आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUNIL PANDURANG PANDHARE

Digitally signed by SUNIL PANDURANG PANDHARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Scl Edu Sports Dept, 2.5.4.20=7F874792415B92BA519384CACB41B53A89CF93DBD96D4BE1F7D97FB6326EED47, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8B7DC58E83C9774E4419A7AEEAC77EAE7CDEA272D759DFB29451BCFE7E3F04C9, cn=SUNIL PANDURANG PANDHARE
Date: 2026.05.04 13:03:02 +05'30'

**( सुनिल पांढरे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत :**

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, राजभवन, मुंबई यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे प्रधान सचिव,
३. मा. उपमुख्यमंत्री, नगर विकास विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
४. मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांचे सचिव
५. मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा/विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
६. मा.सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य, विधानमंडळ, मुंबई

७. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. अतिरिक्त महासंचालक, राष्ट्रीय छात्र सेना संचालनालय, मुंबई
११. महालेखापाल ( लेखा अनुज्ञेयता /लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
१२. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१३. विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, नाशिक विभाग, नाशिक
१४. समादेशक अधिकारी, ४९ महाराष्ट्र बटालियन एन. सी. सी. अमळनेर
१५. अधिदान व लेखाधिकारी,मुंबई
१६. कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. निवड नस्ती (क्रीयुसे- ३ )